माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१००२७/२१/अ.क्र.५८७२/२४/०१**

**श्री. लितेश भुता**
१/२०, भूता निवास, १ ला मजला, डॉ.आंबेडकर रोड,
माटूंगा (पू.), मुंबई-४०० ०१९.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. प्र.) शहर-५,**
न्यू म्युनिसिपल बिल्डींग, भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग,
हनुमान मंदिर समोर, अँटॉप हिल, वडाळा (पू.), मुंबई-४०० ०३७.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी,**
उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) शहर यांचे कार्यालय, न्यू म्युनिसिपल बिल्डींग,
भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग,हनुमान मंदिर समोर, अँटॉप हिल,
वडाळा (पू.), मुंबई-४०० ०३७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०६.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०२.२०२० | ०५.१०.२०२० | ०५.११.२०२० | २६.११.२०२० |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. ०५.१०.२०२० रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. २६.११.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.०४.०१.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ११.०२.२०२० अन्वये "Provide all documents notices,notings,change of user with regard to the Flat no. 1 & 13 of ground floor of wing A in building known as kapole nivas, matunga kapole CHSL Dr, Ambedkar Road, Matunga C. Rly (East) near maheshwari udyan matunga बाबत माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.१०.२०२० रोजी "अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी"असे उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना उपलब्ध असलेली मुद्येनिहाय माहिती ७ दिवसांत देण्यात यावी", असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. ०४.०१.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) श्रीमती राजेश्री पाटील व सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (इ.प्र.) श्री. अमितकुमार सोनावणे, विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (इ.प्र.) श्री. मनिषा साटम उपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) श्रीमती राजेश्री पाटील यांनी आयोगासमोर असे सादर केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी निरीक्षण करीता अपिलार्थी यांना कळविले होते. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना मुद्देनिहाय उत्तर देण्याचे आदेशित केले. त्या अनुषंगाने दि. ०७.०५.२०२१ च्या पत्राने अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) यांनी अपीलार्थी यांना माहिती दिली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

प्रदीप व्यास 26-12-2024

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**